**ठळक बातम्या**

- देशाला स्थिर सरकार देण्याची विरोधकांमध्ये क्षमता नसल्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची कोल्हापूरात टीका
- धर्म आणि जातीच्या नव्हे तर रोजगार, पाणी, रस्ते आणि शिक्षणाच्या मुद्द्यावर मतदान करण्याचं काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांचं लातूरमध्ये आवाहन
- उत्तर मध्य मुंबईतून ज्येष्ठ वकील उज्जल निकम यांना भाजपाकडून उमेदवारी
- ६ देशांमध्ये ९९ हजार मेट्रीक टनांहून अधिक कांदा निर्यातीला केंद्र सरकारची परवानगी, कांद्याच्या विकिरण क्षमतेतही तिप्पट वाढ

**आणि**

- तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत ज्योती वेण्णमची सुवर्णपदकाची हॅटट्रिक

**<><><><><>**

देशाला स्थिर सरकार देण्याची विरोधकांची क्षमता नसल्याचा आरोप प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी कोल्हापुरातल्या प्रचार सभेत केला. यावेळी त्यांनी विरोधकांवर सडकून टीका केली. महाराष्ट्राला सामाजिक न्यायाची परंपरा आणि पण काँग्रेसने सामाजिक न्यायाची हत्या केल्याचा आरोप त्यांनी केला. यासाठी त्यांनी कर्नाटकाचं उदाहरण दिलं.

आगामी टप्प्यांमध्ये महायुतीच्या उमेदवारांना निवडून देण्याचं आवाहन त्यांनी केलं. यावेळी त्यांनी कोल्हापूर आणि पश्चिम महाराष्ट्रात केलेल्या विकास कामांचे दाखले दिले.

राज्यात ‘हर घर मोदी, मन मन मोदी’ आहेत. त्यामुळे महायुतीच्या उमेदवारांना निवडून मोदींच्या ४०० पारच्या स्वप्नाला हातभार लावा, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं.

‘मान देऊया गादीला, मत देऊया नरेंद्र मोदींना’ हे कोल्हापूरकरांनी ठरवलं आहे. कोल्हापूरचा हुंकार दिल्लीत पोहचवा, असं आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

धर्म आणि जातीच्या आधारावर नव्हे तर रोजगार, पाणी, रस्ते आणि शिक्षणाच्या मुद्द्यावर मतदान करा असं आवाहन काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी आज केलं. लातूरमध्ये प्रचारसभेत त्या बोलत होत्या. जाहिरातींना भुलून न जाता वास्तवाकडे लक्ष द्या आणि येत्या ५ वर्षात आयुष्यात सुधारणा करायची असेल तर विचारपूर्वक मतदान करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

भाजपाच्या सरकारनं देशातल्या जनतेच्या समस्या सोडवल्या नाहीत. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यात सरकारला अपयश आल्याची टीका त्यांनी केली. विद्यमान सरकारच्या काळात महागाई वाढली. महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या मुद्द्यावर प्रधानमंत्री काहीही बोलत नाही. राज्यातलं सरकार त्यांनी पैशाच्या बळावर पाडलं, असा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

काँग्रेस पक्ष सत्तेत आला तर महिलांच्या खात्यात  एक लाख रुपये टाकले जातील आणि केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये ५० टक्के राखीव जागा ठेवल्या जातील असं

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज सांगितलं. ते आज आसाममध्ये बारपेटा जिल्ह्यात एका प्रचारसभेत बोलत होते. काँग्रेस पक्ष शिकाऊ उमेदवारी कार्यक्रमातून रोजगार निर्माण करेल आणि तरुणांना लाख विद्यावेतन देईल असंही त्यांनी सांगीतलं.

<><><><><>

भारतीय जनता पक्षानं उत्तर मध्य मुंबईतून ज्येष्ठ वकील उज्जवल निकम यांना उमेदवारी दिली आहे. या मतदारसंघात भाजपाच्या पूनम महाजन विद्यमान खासदार आहेत. निकम यांचा सामना आता काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांच्याशी होणार आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातल्या ८ मतदारसंघात मिळून अंदाजे सरासरी ५९ पूर्णांक ६३ शतांश टक्के मतदान झालं असल्याची माहिती निवडणूक कार्यालयाने दिली आहे. सर्वाधिक ६२ पूर्णांक ६५ शतांश टक्के मतदान वर्ध्यात झालं. सर्वात कमी ५७ टक्के मतदानाची नोंद यवतमाळ-वाशिम मतदारसंघात झाली. बुलढाणा मतदारसंघात ५८ पूर्णांक ४५ शतांश टक्के तर, अकोला मतदारसंघात ५८ पूर्णांक ९ शतांश टक्के मतदान झालं. हिंगोलीत ६० पूर्णांक ७९ शतांश टक्के तर अमरावतीमधे ६० पूर्णांक ७४ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. नांदेडमधे ५९ पूर्णांक ५७ शतांश टक्के तर परभणीत ६० पूर्णांक ९ शतांश टक्के मतदान झालं.

<><><><><>

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी राज्यातल्या चौथ्या टप्प्यातल्या मतदानासाठीच्या उमेदवारी अर्जांची छाननी काल झाली. यासाठी ४४७ उमेदवारांनी ६१८ अर्ज केले होते. छाननीनंतर नंदुरबार लोकसभा मतदारसंघात १६, जळगाव - २०, रावेर - २९, जालना - ३५, औरंगाबाद - ४४, मावळ - ३५, पुणे - ४२, शिरूर - ३५, अहमदनगर - ३६, शिर्डी - २२ आणि बीड लोकसभा मतदारसंघात ५५ असे एकूण ३६९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरल्याची माहिती मुख्य निवडणूक कार्यालयाने दिली. राज्यात चौथ्या टप्प्यातलं मतदान १३ मे रोजी होणार आहे.

<><><><><>

इंडोनिशिया देशाच्या निवडणूक आयोगाच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने आज मंत्रालयातल्या राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला भेट दिली. मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी या शिष्टमंडळाशी संवाद साधला. राज्यातील एकूण मतदार, मतदारांसाठी केलेल्या सोयीसुविधा, मतदार जनजागृती आदींची माहिती चोक्कलिंगम यांनी इंडोनेशियाच्या शिष्टमंडळाला दिली.

<><><><><>

शेतकऱ्यांच्या विरोधातले निर्णय घेण्याचं धोरण नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वातल्या सरकारनं अवलंबल्याची टीका शरद पवार यांनी केली. ते आज महाविकास आघाडीचे माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचारार्थ सांगोला इथं आयोजित जाहीर सभेत बोलत होते. साखर निर्यात बंदी, इथेनॉल निर्मितीवर बंदी, दुधाच्या किंमती कमी करण्याचे प्रयत्न अशी उदाहरण

त्यांनी यावेळी दिली. मनमोहन सिंग यांच्या तुलनेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी फार वेळ संसदेत येत नसल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण उस्मानाबाद लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

कांद्यावरची निर्यातबंदी केंद्र सरकारने काही प्रमाणात शिथिल केली आहे. बांगलादेश, संयुक्त अरब अमिरात, भूतान, बहारीन, मॉरिशस आणि श्रीलंका या सहा देशांमधे ९९ हजार १५० मेट्रिक टन कांद्याची निर्यात करायची परवानगी सरकारनं दिली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत २०२३-२४ या वर्षात खरीप आणि रब्बी पिकांचं उत्पादन कमी असल्याच्या अंदाजाच्या तसंच आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी वाढल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतल्याची माहिती शासनानं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात दिली आहे. दरम्यान, साठवणुकीदरम्यान कांद्याची नासाडी कमी करण्यासाठी ग्राहक व्यवहार विभागाने भाभा अणुसंशोधन केंद्राच्या तांत्रिक पाठबळाने विकिरण प्रक्रिया आणि शीत साठवणूक प्रक्रिया केलेल्या साठ्यात गेल्या वर्षीच्या बाराशे मेट्रिक टनावरून यावर्षी पाच हजार मेट्रिक टन इतकी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या वर्षी कांदा विकिरण आणि शीत साठवणूक प्रक्रियेचा अवलंब केल्यावर कांद्यांची नासाडी १० टक्क्यांपेक्षा कमी झाल्याचे आढळले होते.

<><><><><>

शांघाय इथं सुरु असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या ज्योती सुरेखा वेण्णम हिने आज सुवर्णपदकाची हॅटट्रिक केली. अंतिम सामन्यात तिने अव्वल मानांकित अँड्रिया बेकेरा हिला पराभूत करुन सुवर्णपदक पटकावलं. त्याआधी ती, आदिती स्वामी आणि परनीत कौर यांच्या कंपाऊंड संघाने इटलीला २३६-२२५ असं हरवून कंपाऊंड प्रकारातलं सुवर्णपदक जिंकलं. तर मिक्स्ड डबल्स प्रकारातही ज्योतीने अभिषेक वर्मासह भागीदारी करत इस्टोनियन खेळाडूंना १५८-१५७ असं हरवलं आणि मिक्स्ड डबल्स प्रकारातलं सुवर्णपदकही जिंकलं.

अभिषेक वर्मा, प्रियांशु आणि प्रथमेश फुगे यांनी कंपाउंड प्रकारात पुरुष गटात अंतिम फेरीमध्ये नेदरलँड्सला २३८-२३१ असं हरवून सुवर्णपदक जिंकलं.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना सुरु आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना दिल्ली कॅपिटल्सनं मुंबई इंडियन्ससमोर २५८ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे.

याच स्पर्धेतला दुसरा सामना लखनौ सुपर जायंट्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात लखनौत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी क्रिकेट स्टेडियमवर साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा करण्याचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

कोकणातील तुरळक क्षेत्रात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. कोकणातील तुरळक क्षेत्रात उष्ण आणि दमट परिस्थिती राहण्याची शक्यता आहे.मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या जिल्ह्यांमध्ये एक किंवा दोन ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

<><><><><>

धुळे जिल्ह्यात दोन ठिकाणी बालविवाह रोखण्यात जिल्हा प्रशासनाला यश आल्याची माहिती जिल्हा महिला आणि बालविकास अधिकाऱ्यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. साक्री तालुक्यात इंदवे तर धुळे तालुक्यातल्या कापडणे इथे होणारे बालविवाह प्रशासनाने घटनास्थळी जाऊन रोखले. यावेळी उपस्थितांना बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ ची माहितीही दिली.

<><><><><>

बुलडाणा जिल्ह्यात जळगाव जामोद बुऱ्हाणपुर महामार्गावर करोली घाट इथं एका प्रवासी बसचं नियंत्रण सुटल्यानं ही बस १०० फूट खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात बसमधले २८ प्रवासी जखमी झाले. खासगी कंपनीची ही बस मध्य प्रदेशच्या इंदोर इथून अकोला इथं चालली होती अशी माहिती पोलिसांनी दिली.